डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
ता.दापोली-४१५ ७१२ जिल्हा-रत्नागिरी

email id-universityengineer@dbskkv.ac.in दुरध्वनी क्रमांक : ०२३५८–२८२४११,१२,१३

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे–७/११०७/२०२३, दिनांक : २४ मे, २०२३
संदर्भ :डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे–७/९३६/२०२३, दिनांक : २८ एप्रिल, २०२३

# जाहिरात (पहिली मुदतवाढ)

## डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली अंतर्गत पालघर,(जि.पालघर) ते निळेली(जि. सिंधूदूर्ग) या कार्यक्षेत्रामधील सर्व प्रक्षेत्रांवरील न्यायालयीन प्रकरणात मार्गदर्शन करणे व कायदा विषयक सल्ला देण्यासाठी पालघर,रायगड,रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग या चार जिल्हांकरिता कायदा सल्लागारांचे पॅनल नियुक्ती करणेकरिता जाहिरात

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली अंतर्गत पालघर (जि.पालघर) ते निळेली (जि.सिंधूदूर्ग) म्हणजेच पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग या चार जिल्हयांमधील कार्यरत असलेल्या विद्यापीठाच्या सर्व प्रक्षेत्रावरील अतिक्रमणे, हद्दीबाबतची विवादीत प्रकरणे ,महसूल विभाग किंवा तत्सम शासकीय कार्यालय यांचेकडे अपील करणे व त्याबाबत कायदेशीर सल्ला प्राप्त करून घेणे, जमीन विषयक कामकाज तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडणे व न्यायालयीन प्रकरणांमध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे, अपील प्रस्ताव करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करून निपटारा करणे अशा प्रकारे कामाचे स्वरूप असल्यामुळे व अश्या प्रकारे जिल्हावार प्रकरणे हाताळलेल्या कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांकडून अथवा कायदा सल्लागार फर्म यांचेकडून दिनांक २३/०५/२०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत पोहोचतील अशा बेताने अर्ज मागविण्यात आले होते. परंतु काही कारणास्तव **वरील कामाकरिता अर्ज सादर करण्याचा कालावधी हा वाढविण्यात आला असून तो कालावधी दिनांक २४/०५/२०२३ ते दिनांक ०७/०६/२०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत असा राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

वरील कामाकरिता इच्छुक उमेदवार अथवा कायदा सल्लागार फर्म ज्यांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे त्यांना कामाचे आवश्यकतेनुसार प्रथमत: एक वर्षाकरिता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे काम समाधानकारक वाटल्यास कामकाजाचा पुढील कालावधी वाढविण्यात येईल व हा कालावधी जास्तीत जास्त पाच वर्षे राहील.

कायदा सल्लागार पॅनलसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज द्विलखोटा पध्दतीने सादर करावयाचे आहेत. त्यापैकी लखोटा क्र.०१ मध्ये संपूर्ण वैयक्तिक तपशीलासह माहिती व आवश्यक त्या शैक्षणिक अर्हतेसंदर्भातील माहिती, अनुभवाचा दाखला इ.कागदपत्रे सादर करावयाची आहेत. तसेच लखोटा क्र.०२ मध्ये कायदा सल्लागार यांचे शुल्क याबाबतची माहिती सादर करावयाची आहे. तसेच लखोटा क्र.०१ व ०२ सादर करताना परिशिष्ठ अ व परिशिष्ठ ब यांचे काटेकोरपणे अवलोकन करावे. सदर दोन्ही लखोटे तिसऱ्या स्वतंत्र लखोटयामध्ये सील बंद करून **विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली,जि.रत्नागिरी ४१५७१२ यांचे कार्यालयात दिनांक २४/०५/२०२३ ते दिनांक ०७/०६/२०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत.** सदर लखोटयावर कामाचे नाव, स्वत:चे पूर्ण नाव, दूरध्वनी क्रमांक,पूर्ण पत्ता व ज्या जिल्हासाठी अर्ज करावयाचा आहे त्याचे नाव स्पष्टपणे नमूद करावे. तसेच ज्या उमेदवारांनी मुदतवाढीच्या पूर्वी अर्ज कार्यालयात पाठविले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यांनी पूर्वी ज्या जिल्हयासाठी अर्ज केला असल्यास त्याव्यतिरिक्त अन्य जिल्हयासाठी अर्ज करावयाचा असल्यास अर्ज करू शकतात. तसेच विहीत कालावधीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**अर्जाचा नमूना, शपथपत्र, इतर अटी व शर्ती तसेच उक्त जाहिरातीची मुदतवाढीची प्रत www.dbskkv.org या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

सहि/–
(बी.आर.साळवी)
कुलसचिव
डॉ.बा.सा. कोकण कृषी विद्यापीठ,दापोली

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
# ता.दापोली जि.रत्नागिरी ४१५७१२

## डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली अंतर्गत पालघर,(जि.पालघर) ते निळेली(जि. सिंधूदूर्ग) या कार्यक्षेत्रामधील सर्व प्रक्षेत्रांवरील न्यायालयीन प्रकरणात मार्गदर्शन करणे व कायदा विषयक सल्ला देण्यासाठी पालघर,रायगड,रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग या चार जिल्हांकरिता कायदा सल्लागारांचे पॅनल नियुक्ती करणेकरिता जाहिरात

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली अंतर्गत पालघर (जि.पालघर) ते निळेली (जि. सिंधूदूर्ग) म्हणजेच पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग या चार जिल्हयांमधील कार्यरत असलेल्या विद्यापीठाच्या सर्व प्रक्षेत्रावरील अतिक्रमणे, हद्‌दीबाबतची विवादीत प्रकरणे ,महसूल विभाग किंवा तत्सम शासकीय कार्यालय यांचेकडे अपील करणे व त्याबाबत कायदेशीर सल्ला प्राप्त करून घेणे, जमीन विषयक कामकाज तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडणे व न्यायालयीन प्रकरणांमध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे, अपील प्रस्ताव करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करून निपटारा करणे अशा प्रकारे कामाचे स्वरूप असल्यामुळे व अश्या प्रकारे जिल्हावार प्रकरणे हाताळलेल्या कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांकडून अथवा कायदा सल्लागार फर्म यांचेकडून दिनांक २४/०५/२०२३ ते दिनांक ०७/०६/२०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत पोहोचतील अशा बेताने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | कायदा/विधी सल्लागार | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली अंतर्गत पालघर ते निळेली म्हणजेच पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग या चार जिल्हयांमधील कार्यरत असलेल्या विद्यापीठाच्या सर्व प्रक्षेत्रावरील अतिक्रमणे, हद्‌दीबाबतची विवादीत प्रकरणे ,महसूल विभाग किंवा तत्सम शासकीय कार्यालय यांचेकडे अपील करणे व त्याबाबत कायदेशीर सल्ला प्राप्त करून घेणे, जमीन विषयक कामकाज तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडणे व न्यायालयीन प्रकरणांमध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे, अपील प्रस्ताव करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करून निपटारा करणे व अश्या प्रकारे जिल्हावार प्रकरणे हाताळलेल्या कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |

अ) अर्हता व अनुभव

१. उमेदवाराकडे अथवा कायदा सल्लागार फर्मकडे नमूद कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

२. उमेदवारास अथवा कायदा सल्लागारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.

३. नियुक्त करावयाच्या उमेदवार अथवा कायदा सल्लागार शारिरीक,मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

४. नियुक्त करावयाच्या उमेदवाराविरूध्द अथवा कायदा सल्लागार फर्मविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्ज सादर करतेवेळी करणे बंधनकारक राहील.

# परिशिष्ठ – "अ"

**१) कर्तव्ये व जबाबदाऱ्या :–**

१. विद्यापीठाकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरूपात पत्र प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरूपात सल्ला देणे

२. विद्यापीठाच्या न्यायालयीन प्रकरणांचा आढावा व पाठपुरावा करणे

३. विद्यापीठाच्या वतीने न्यायालयात दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र, परिच्छेदनिहाय उत्तर तयार करणे व कायदेविषयक सल्ला देणे.

४. विद्यापीठाकडून दाखल करावयाचे याचिकांचे परिच्छेदनिहाय अभिप्राय/शपथपत्राचे प्रारूप कायदेशीरदृष्टया बरोबर आहे किवा कसे याबाबत संबंधित कार्यालयाकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर विद्यापीठाने तयार केलेल्या प्रारूपाची छाननी/ तपासणी करून आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

५. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित वेळेत पार पाडणे

६. विद्यापीठ कार्यालयातील कर्मचाऱ्याची लेखनीक म्हणून किंवा टंकलखनासाठी मदत घेता येणार नाही तसेच नियुक्त उमेदवार यांना ठरवून दिलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या सुविधा जसे कि शासकीय वाहन,वाहन भत्ता, प्रवासभत्ता टंकलेखन सामग्री अनुदान, अथवा तद्अनुषांगिक लाभ देय राहणार नाहीत.

**२) नियुक्ती कालावधी :–**

प्रथम नियुक्ती १२ महिन्याकरिता राहील. नियुक्त केलेल्या उमेदवाराचे अथवा कायदा सल्लागार फर्म यांचे काम समाधानकारक आढळून आल्यास पुढील कालावधीकरिता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल. हा कालावधी ५ वर्षापेक्षा जास्त नसेल. काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास नियुक्तीचा कालावधी कमी देखील करण्यात येईल तसेच कोणतीही पूर्व सूचना न देता कोणत्याही क्षणी नियुक्ती संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असतील.

**३) इतर अटी व शर्ती :–**

१. नियुक्त उमेदवारास अथवा कायदा सल्लागार फर्म शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. त्याकरिता कोणतीही पूर्व सूचना दिली जाणार नाही.

३. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारानी अथवा कायदा सल्लागार फर्म यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

४. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी अथवा कायदा सल्लागार फर्म यांनी त्यांना सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामाकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील. तसेच नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारानी प्रत्येक महिन्यात त्यांच्याकडे आलेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणांचा मासिक प्रगती अहवाल नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

५. संगणकाचे ज्ञान असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रीया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

७. निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारास अथवा कायदा सल्लागार फर्म यास या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहीत नमुन्यात रू.५००/– चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र सादर करावे लागेल.

८. अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहीलेला/टंकलिखीत अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे की, संपूर्ण नाव,पत्ता,शिक्षण,काम केलेल्या विभागाचे नाव,अनुभव दाखले,इ) दि.२४/०५/२०२३ ते दि.०७/०६/२०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजा दिवशी कार्यालयाच्या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावेत.

९. ज्या उमेदवारांनी मुदतवाढीच्या पूर्वी अर्ज कार्यालयात पाठविले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यांनी पूर्वी ज्या जिल्हयासाठी अर्ज केला आहे त्याव्यतिरिक्त अन्य जिल्हयासाठी अर्ज करावयाचा असल्यास तसा अर्ज विहीत नमुन्यामध्ये ते सादर करू शकतात.

१०.सोबत अर्जाचा नमूना जोडला आहे.

**ब) अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना**

१. ज्या जिल्हासाठी अर्ज केला आहे त्या जिल्हयाचे नाव लखोटयावर स्पष्टपणे नमूद करावे.

२. अर्जदारांनी कायदा सल्लागार यांचे शुल्क लखोटा क्र.०२ मध्ये सादर करते वेळी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट ब** चे अवलोकन करावे.

३. निवड प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराबाबत अथवा कायदा सल्लागार फर्म बाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहि/—
(बी.आर.साळवी)
कुलसचिव
डॉ.बा.सा. कोकण कृषी विद्यापीठ,दापोली

# परिशिष्ठ – "ब"

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधूदुर्ग या चार जिल्हामध्ये कार्यरत असलेली कार्यालये/संशोधन केंद्रे/प्रक्षेत्रे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र. | जिल्हाचे नाव | संशोधन केद्राचे नाव/कार्यालयाचे नाव/प्रक्षेत्राचे नाव |
|---|---|---|
| १ | पालघर जिल्हा | १)कृषी संशोधन केंद्र पालघर,जि.पालघर |
| २ | रायगड जिल्हा | १)प्रादेशिक कर्जत संशोधन केंद्र कर्जत, जि.रायगड |
| | | २)खार जमीन संशोधन केंद्र पनवेल,जि.रायगड |
| | | ३)कृषी विज्ञान केंद्र रोहा,जि.रायगड |
| | | ४)काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था किल्ला रोहा, जि.रायगड |
| | | ५)कृषी तंत्र विद्यालय,रोहा जि.रायगड |
| | | ६)कृषी संशोधन केंद्र,रेपोली,जि.रायगड |
| | | ७)सुपारी संशोधन केंद्र,श्रीवर्धन जि.रायगड |
| ३ | रत्नागिरी जिल्हा | १)डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली, जि.रत्नागिरी –मुख्यालय येथील सर्व महाविद्यालये,संशोधन केंद्र/प्रक्षेत्र |
| | | २)मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,ता.दापोली, जि.रत्नागिरी अंतर्गत रूखी, असोंड, गावतळे, टेटवली, पांगारी, सडवे येथील सर्व प्रक्षेत्रे |
| | | ३)कृषी संशोधन केंद्र,आवाशी,खेड जि.रत्नागिरी |
| | | ४)प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र,भाटये,जि.रत्नागिरी |
| | | ५)कृषी संशोधन केंद्र,शिरगाव, जि.रत्नागिरी |
| | | ६)मत्स्य महाविद्यालय,शिरगाव,जि.रत्नागिरी |
| | | ७)मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम,शिरगाव,जि.रत्नागिरी |
| | | ८)सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र पेठकिल्ला,जि.रत्नागिरी |
| | | ९)कृषी तंत्रज्ञान माहिती उपकेंद्र,गणपतीपुळे,जि.रत्नागिरी |
| | | १०)कृषी तंत्र विद्यालय,लांजा जि.रत्नागिरी |
| | | ११)कृषी विज्ञान केंद्र लांजा,जि.रत्नागिरी |
| ४ | सिंधूदुर्ग जिल्हा | १)कृषी संशोधन केंद्र,फोंडाघाट,जि.सिंधूदुर्ग |
| | | २)आंबा संशोधन उपकेंद्र,रामेश्वर ता.देवगड,जि.सिंधूदुर्ग |
| | | ३)पशुधन संशोधन केंद्र,निळेली ता.कुडाळ,जि.सिंधूदुर्ग |
| | | ४)उद्यानविद्या महाविद्यालय,मुळदे,ता.कुडाळ जि.सिंधूदुर्ग |
| | | ५)प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,वेगुर्ला जि.सिंधूदुर्ग |

टिप : प्रस्तावित जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार विद्यापीठाच्या वर नमूद केलेल्या प्रक्षेत्रावरील अतिक्रमणे, हद्दीबाबतची विवादीत प्रकरणे,महसूल विभाग किंवा तत्सम शासकीय कार्यालय यांचेकडे अपील करणे व त्याबाबत कायदेशीर सल्ला प्राप्त करून घेणे, जमीन विषयक कामकाज तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडणे व न्यायालयीन प्रकरणांमध्ये दाखल करावयाचे उत्तराचे प्रारूप तयार करणे, अपील प्रस्ताव करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करून निपटारा करणे अशा कामांकरिता संबंधित जिल्हयातील संशोधन केंद्रे/कार्यालये/प्रक्षेत्रे इ. ठिकाणी अधिक माहिती घेण्यासाठी कायदा/विधी सल्लागार यांना प्रत्यक्षात जावे लागल्यास त्याबाबत होणारा वाहन खर्च,प्रवास भत्ता याकरिता होणाऱ्या अंदाजित खर्चाचा तपशील लखोटा क्र.०२ सादर करताना विचारात घ्यावा.

# अर्जाचा नमूना

प्रति,
..........................................
..........................................
..........................................
..........................................

फोटो

विषय :—

संदर्भ :—

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशीलवार जाहीरात वाचली असून, माझा वैयक्तिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव —

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी —

३. ज्या जिल्हयातील सल्लागार म्हणून अर्ज करावयाचा आहे त्या जिल्हयाचे नाव —

४. संपूर्ण पत्ता व मोबाईल/संपर्क क्रमांक/ईमेल आयडी —

५. शैक्षणिक अर्हता —

६. अनुभव — (संबंधित कार्यालय प्रमुखाचा अनुभवाचा दाखला जोडणे आवश्यक)

| अ.क्र. | कार्यालय/संस्थेचे नाव | सल्लागार नियुक्तीचा दिनांक | कालावधीचा अनुभव |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

७. इतर पुरवणी माहिती —

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक

# प्रतिज्ञापत्र

## (रू.५००/— बॉन्डपेपरवर)

मी याद्वारे प्रमाणीत करतो/करते की, या अर्जामध्ये नमूद केलेली माझी माहिती ही पूर्णपणे खरी आहे. सादर केलेली माहिती नेमणुकीवेळी अथवा नेमणूकीनंतरही खोटी अथवा चुकीची आढळल्यास माझ्यावर करणेत येणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र असेन. आपण प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमधील नमूद केलेल्या अटी व शर्तीचे मी वाचन केले असून ते मला पुर्णपणे मान्य आहेत, असे मी शपथपूर्वक लिहून देत आहे.

दिनांक :—

स्थळ :—

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक